# भारतीय लोकशाही आणि निवडणूक सुधारणा

**डॉ.अरुण चव्हाण**, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता.करवीर कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही असणारा देश आहे असे नेहमी म्हटले जाते. लोकशाही म्हणजे लोकांचे शासन असा त्याचा अर्थ घेतला जातो पण खरे पाहता आज भारतीय लोकशाहीचे स्वरूप दूषित झाल्यासारखे दिसते त्याची असंख्य कारणे असू शकतात भारतीय लोकशाही समोर आज असंख्य आव्हाने उभी आहेत गुन्हेगारी बेरोजगारी दारिद्र्य निवडणुकांमधील गैरकारभार यासारख्या असंख्य प्रश्न भारतीय लोकशाही समोर असतानाच भारतीय लोकशाही मध्ये घराणेशाही ने व मूर्ती पूजने शिरकाव केला आहे असे दिसते लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांसाठी लोकांच्या द्वारे चालवलेले शासन होय अशी लोकशाहीची व्याख्या केली जाते म्हणजे लोकशाही व्यवस्थेमध्ये जनता सार्वभौम असते त्यांना हवे असणारे प्रतिनिधी ते स्वतः निवडू शकतात त्यासाठी लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला जातो. या मतदानाच्या अधिकाराचा वापर करूनच जनता आपले सार्वभौमत्व सिद्ध करत असली तरी आज कोठे ना कोठे लोकशाही विशुद्ध होत असताना दिसत आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे किंबहुना हा लोकशाहीचा प्राण मानला जातो यासाठी स्वतंत्र निष्पक्ष पद्धतीने निवडणुका होणे खूप महत्त्वाचे आहे यासाठी निर्वाचन आयोग स्वतंत्र ठेवण्यात आला आहे जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देश म्हणून भारताला ओळखले जाते लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये जनता सार्वभौम असते असे मानले जाते पण आज वस्तूस्थिती पाहता वेगळे चित्र आपणास दिसते. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क बहाल केला आहे तो यासाठी की ही जनता या देशाची अंतिम धनी आहे त्यामुळे त्यांना हवे असणारे राज्यकर्ते ते निवडू शकतात व नको असणाऱ्या राज्यकर्त्यांना तेच सत्तेवरून दूर करू शकतात. पण आज निवडणूक यंत्रणा ही सत्ताधारी पक्षाच्या हातचे खेळणे होऊन बसले आहे जनतेच्या मताचा अधिकार नाममात्र राहिला आहे दिसते ७५ वर्षांपूर्वी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या अभ्यास मंडळासमोर व त्रेसष्ट वर्षापूर्वी जनतेला उद्देशून लिहिलेल्या खुल्या पत्रात या संसदीय लोकशाहीचे यथार्थ विश्लेषण मांडले होते त्यात काही फरक पडला असेल तर तो एवढाच या लोकशाहीचा स्वभावधर्म उत्तरोत्तर अधिक जनविरोधी होत गेला आहे लोकशाहीत लोक या घटकाला सर्वात वरचे स्थान असले पाहिजे होते परंतु त्यांना केवळ मतदार एवढाच अर्थ या लोकशाहीने बहाल केला आहे. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणूक यंत्रणा निर्दोष व्हावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे त्यासाठी वेळोवेळी वेगवेगळ्या निवडणूक सुधारणा शिफारशी केल्या जातात त्यांचे यथार्थ विश्लेषण करण्याचा छोटासा प्रयत्न.

**उद्दिष्टे** :

1.भारतीय लोकशाहीची वाटचाल अभ्यासणे. 2 भारतातील निवडणूक यंत्रणा चा अभ्यास करणे . 3. आज पर्यंत झालेल्या निवडणूक सुधारणांचा आढावा घेणे. 4.लोकशाही आणि निवडणुका यांचा यथार्थ संबंध अभ्यासणे

विषय विवेचन- भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देश असला तरी भारतीय लोकशाहीला आज वळण लागल्याचे आपणास दिसते भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे संसदीय लोकशाहीमध्ये राज्याचा प्रमु जनते द्वारे नियुक्त केला जातो व राज्याची अंतिम सत्ता लोकांच्या

हाती केंद्रित झालेली असते असे मानले जाते . भारतामध्ये अप्रत्यक्ष लोकशाही असून जनतेला राज्यकारभार यामध्ये सहभागी करून घेण्यासाठी त्यांना मतदानाचा अधिकार घटनेने बहाल केला आहे. भारतीयना सर्वप्रथम निवडणुकीच्या तत्वाची ओळख १९०९ च्या मोर्ले मिंटो सुधारणा कायद्यानुसार झाली स्वतंत्र भारतात 1952 पासून सार्वत्रिक निवडणुकांना सुरुवात झाली तेव्हापासून या देशाची जनता निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होत आहे व आपले सार्वभौमत्व सिद्ध करत आहे तरीदेखील आज भारतीय लोकशाही समोर असंख्य आव्हाने आज तोंड काढून उभी आहे निवडणुकी मध्ये मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी ने थैमान माजवले आहे निवडणुकांमध्ये अनेक प्रकारचे गैरकारभार होताना दिसत आहेत मतदानाचा अधिकार हा फक्त नागरिकांना मात्र राहिलेला आहे पक्षनिष्ठचा अभाव, राजकीय पक्षांचा व पुढाऱ्यांचा दिखाऊपणा निवडणुकींमधील भ्रष्टाचार गैरकारभार यासारखे अनेक प्रश्न आज निवडणूक प्रक्रियेमध्ये उद्भवलेले आहे. त्यामुळे त्यात सुधारणा होणे खूप गरजेचे आहे व त्यासाठी वेळोवेळी प्रयत्नदेखील केले जातात. भारतात निवडणुकीच्या दोन प्रणाली आहेत 1) प्रत्यक्ष 2) अप्रत्यक्ष दोन्ही निवडणूक प्रणालीत सुधारणा होणे महत्त्वाचे आहे लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी ही सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे.

निवडणूक सुधारणा ची आवश्यकता व्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावे यासाठी लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी मजबूत करण्यासाठी निवडणूक सुधारणा होणे गरजेचे आहेधन आणि सत्तेच्या प्रभावाला कमी करणे नैतिकतेचा अभाव- लालबहादूर शास्त्री प्रमाणे देश सेवा करणारा एखादाच राज्यकर्ता आपणास दिसेल कारण आज सर्व काय चाललेले आहे त्यामुळे राज्यकर्त्यांना नैतिक शिक्षण देणे गरजेचे आहेबाहुबली नेत्यांच्या वर्चस्वाला आळा घालणेगुन्हेगारांचे राजकियीकरण थांबवणे निवडणुकांबाबत गंभीर नसणाऱ्या उमेदवाराला दूर ठेवणेजातिवाद संप्रदाय वादयासारख्या अनेक प्रश्नांसाठी निवडणूक सुधारणा होणे आज गरजेचे आहे निवडणूक सुचविण्यासाठी किंवा निवडणूक सुधारणा करण्यासाठी आज पर्यंत वेगवेगळ्या समित्या संघटना स्थापन करण्यात आल्या आहे त्यांनी वेगवेगळ्या शिफारशी सुचविल्या आहेत

**मुख्य समित्या**

1)तारकुंडे समिती (१९७४)- १९७४मध्ये गठित करण्यात आलेल्या या समितीने निवडणूक सुधारणा संबंधित पुढील शिफारसी सुचवल्या१) मतदानाचे वय २१ वरुन १८ वर्ष इतके करण्यात आले (६१ वी घटना दुरुस्ती)

२) निवडणुकांसाठी किमान खर्चाची रक्कम ठरविणे( सध्या लोकसभेसाठी ७० लाखापेक्षा जास्त रुपये खर्च करता येणार नाही)

३) राजकीय पक्षाने आपल्या उमेदवारांचा लेखाजोखा निर्वाचन आयोगाला सादर करणे

४)अनामत रक्कम घेणे( यामुळे गैरगंभीर उमेदवारीला आळा बसेल) तारकुंडे समितीने वरील शिफारशी सुचविल्या होत्या पण बूथ कॅप्चरिंग अँड बोगस वोटिंग याबाबत कोणतेच विवेचन केले नाही.

दिनेश गोस्वामी समिती ( १९९०) १९९० मध्ये दिनेश गोस्वामी गठित करण्यात आली त्यांनी पुढील सुधारणा सुचविल्या

१.बूथ कॅप्चरिंग झालेल्या ठिकाणी पुन्हा मतदान घेणे

२.ईव्हीएम मशीन चा वाप

३.निर्वाचन संबंधी याचिकांवर शिग्र निर्णय

४. मतदान ओळखपत्र

५.रिक्त पदावर सहा महिन्याच्या आत निवडणुका

अशा शिफारशी या समितीने सुचविल्या त्याचबरोबर पोहरा समिती (१९९३), त्याचबरोबर निर्वाचन आयोगाच्या शिफारशी- १९९८ इंद्रजित गुप्ता समिती १९९८ विधी आयोगाच्या शिफारशी- १७०वा अहवाल- १९९९, २४४ वा अहवाल- २०१४, २५५ वा अहवाल- २०१५ विवेक तनखा समिती या अनेक समित्या निवडणूक सुधारणा संबंधित गठीत करण्यात आल्या होत्या त्यांनी वेगवेगळ्या सुधारणा सुचविल्या निवडणूक सुधारणा संबंधी प्रामुख्याने दोन टप्पे करता येतात

**अ) २००० पूर्वी निवडणूक सुधारणा( विसाव्या शतकातील) :**

१मतदाराचे वय 21 वरून 18 पर्यंत करण्यात आले

२.मुख्य निर्वाचन आयुक्त व त्याच्याबरोबर इतर सहाय्यक आयुक्ताची तरतूद

३.निर्वाचन आयोग यासाठी इतर प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे

४.ईव्हीएम मशीनचा वापर निवडणुका निष्पक्ष सटीक पारदर्शी होण्यासाठी सर्वप्रथम १९९८ राजस्थान मध्य प्रदेश दिल्ली निवडणुकांमध्ये वापर करण्यात आला. जनप्रतिनिधित्वाचा कायदा १९५१ मध्ये १९९८ मध्ये संशोधन होऊन ईव्हीएम चा वापर मान्य करण्यात आला१५ मार्च १९८९

५.राष्ट्रीय सन्मान अधिनियम १९७१- हा राष्ट्रीय प्रतिकांचा अपमान केल्यास सहा वर्षे निवडणूक लढवता येणार नाही

६.राष्ट्रपतीपदासाठी५० व्यक्तींनी सूचक व ५० व्यक्तींनी अनुमोदक म्हणून उमेदवार मान्य करावा

७दोन पेक्षा अधिक मतदान क्षेत्रातून निवडणूक लढवता येणार नाही एखादा उमेदवार निवडणुकीच्या आधी मृत झाल्यास निवडणूक रद्द होणार नाही

**ब. २०००नंतरच्या निवडणूक सुधारणा-**

१.लोकप्रतीनिधित्वाच्या कायद्यानुसार मतदान सुरू झाल्यापासून मतदान समाप्त होईपर्यंत अर्धातास एक्झिट पोलवर बंदी

२.लोकसभा निवडणुकीसाठी मोठ्या राज्यात ७० लाख तर लहान राज्यात २८ लाख खर्च करता येऊ शकतात

३.इलेक्शन ड्युटी असलेल्या कर्मचाऱ्यांना पोस्टल बॅलटच्या माध्यमातून मत नोंदवता येऊ शकतो

४.जे भारतीय विदेशात राहत आहे व अजून भारतीय नागरिक आहेत त्यांना मतदानाचा अधिकार आहे

५.युवकांनी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय भाग घ्यावा यासाठी २५जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करणे (२०११पासून) त्याच बरोबर निवडणूक सुधारणा मधला एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे NOTA चा अधिकार Right to reject हा अधिकार व्यक्तीला देण्यात आला आहे. सुरुवातीला या अधिकाराची गोपनीयता राहत नाही कारण मतदान अधिकाऱ्याला सांगावे लागत व एका रजिस्टर मध्ये हस्ताक्षर करावे लागत यामुळे मतदाराच्या "वोट ऑफ सीक्रेट बॅलेट" या अधिकाराचे दमन होत असे २७ सप्टेंबर २००३ ला सर्वोच्च न्यायालयाने या नोटाच्या अधिकाराला मान्यता दिली आहे. आज निवडणूक प्रक्रियेमध्ये या अधिकाराचा वापर जनता मोठ्या प्रमाणावर करताना दिसतेपिंक बूथ-महिलांना जास्तीत जास्त मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी पिंक बूथ संकल्पना २०१८साली सुरू करण्यात आली. याचा मुख्य उद्देश महिलांना निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी करून घेणे हा आहे. या पोलिंग बूथ वर सर्व मतदान अधिकारी कर्मचारी सर्व महिला राहतील तसेच सुरक्षा कर्म देखील महिलाच राहतील असे ठरविण्यात आले पिंक बूथ पिंक( गुलाबी रंगाने) सजविली जातात निवडणूक कर्मचाऱ्यांना गुलाबी रंगाचे कपडे दिले जातात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी हे करण्यात आले.लोकशाही विकेंद्रीकरण यासाठी सर्वांनी निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होणे अत्यंत गरजेचे

आहे यासाठी निवडणूक आयोगाकडून विविध प्रयत्न केले जातात. निवडणुका पारदर्शक सटीक निष्पक्ष व्हाव्या यासाठी अनेक सुधारणा आज पर्यंत झाल्या आहेत.

**समारोप-**

लोकशाहीमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण होणे खूप गरजेचे असते आणि सर्वांचा राजकारणामध्ये सहभाग हा देखील खूप महत्त्वाचा मानला जातो लोकशाही व्यवस्थेमध्ये जनता अंतिम धनी असल्यामुळे तिला निवडणूक प्रक्रियेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याची संधी मिळणे गरजेचे आहे यासाठी काळानुरूप निवडणूक प्रक्रियेमध्ये करणा होणे गरजेचे आहे व त्या पद्धतीने सुधारणा भारतीय निवडणूक यंत्रणांमध्ये झाल्याचे दिसते. तसेच आज लोकशाहीचे जे विकृत स्वरूप आपण पहात आहोत त्याचे वर्णन आंबेडकरांनी असे केले आहे की"लोक आपल्या मालकाला मत देतात व स्वतःवर राज्य करण्यास त्यांना मोकळे सोडून देतात" हे त्यांचे वर्णन यथायोग्य म्हणावे लागेल.

**संदर्भ-**

१.गणराज्याचे शासन आणि राजकारण- भा ल भोळेभारतीय शासन आणि राजकारण- डॉ. संजय खंडारे
२.डॉ. हनुमंत कुरकुटे, डॉ. वसंत खरात, डॉ. श्रीकांत देशमुख, 'भारतीय लोकशाहीतील वाटचाल',अथर्व पब्लिकेशन,२०२१
३.प्रा.बाळ कांबळे (संपादक), ' भारतीय लोकशाही समोरील आव्हाने', डायमंड पब्लिकेशन
४.डॉ.दीपक पवार , "लोकशाही समजून घेताना', महाराष्ट्र शासन , जानेवारी २०२२
५.दैनिक सकाळ
६.लोकसत्ता